**नियमित दिवाणी दावा क्र.११०/२०२६**
स्वानंदी पाटेकर व इतर
वि.
काकासाहेब पाटेकर व इतर
MHAH190005212026

## <u>निशाणी क्र.१० वरील आदेश.</u>

**१.** वादी ने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्ती करीता दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी प्रतिवादी विरुध्द दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी वादीस पुर्ण माहिती नसल्यामुळे वादी क्र.२ चे सासरे काकासाहेब यांचे दोन विवाह झालेले असुन, प्रतिवादी क्र.१ पहिली पत्नी नामे नंदा उर्फ नंदाबाई काकासाहेब पाटेकर ही दिनांक १५/१०/२०१८ रोजी मयत झाली. त्यामुळे सदर दाव्यात वंशावळीमध्ये काकासाहेब च्या समोर मयत पत्नी नंदा उर्फ नंदाबाई काकासाहेब पाटेकर असा उल्लेख करणे आहे. परिच्छेद क्र.०२ मधील पूर्ण मजकूर वगळून पुढील मजकूर समाविष्ट करावयाचा आहे.

" काकासाहेब (मूळ पुरुष)

नंदा उर्फ नंदाबाई (मयत) छाया (दुसरी पत्नी )

अभिषेक प्रियंका

लक्ष्मी (पत्नी )

स्वानंदी

या प्रमाणे वादी व प्रतिवादी यांची वंशावळ आहे.

सदर दाव्यातील वादी नं. १ स्वानंदी ही वादी नं. २ लक्ष्मी व प्रतिवादी क्र. ३ अभिषेक यांची मुलगी आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ काकासाहेब यांचे पहिले लग्न नंदा उर्फ नंदाबाई हिचेशी होवून एक मुलगा अभिषेक व एक मुलगी प्रियंका अशी अपत्ये झालेली आहे. नंदा उर्फ नंदाबाई ही दि. १५/१०/२०१८ रोजी मयत झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ काकासाहेब याने प्रतिवादी क्र. २ छाया हिचेसोबत दुसरा विवाह केलेला असुन, त्यांना कोणतेही अपत्ये झालेले नाही.”

**३.** प्रस्तुत दुरुस्ती केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नसुन, दुरस्ती

करण्याची परवानगी मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचे दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूपामध्ये कोणताही बदल होत नाही. सदरचे दुरूस्तीस परवानगी न मिळाल्यास वादीचे कधीही व कशानेही न भरून येणारे नुकसान होईल त्यावरुन वादीने सदर दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचा खुलासा दाखल केला. प्रतिवादीचे म्हणण्यानुसार सदर अर्ज मंजूर होणेस त्यांची हजरकत आहे त्यामुळे त्यांनी योग्य तो आदेश व्हावा.

**५.** वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले.

**६.** वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी क्र.०२ चे सासरे काकासाहेब यांचे दोन विवाह झाले बाबत माहिती नसल्यामुळे वंशावळीमध्ये नाते संबंधाबा विषयी मजकूर समाविष्ट करण्याचा राहुन गेला असल्याचे वादीच्या कथनावरुन व शपथपत्रावरुन दिसुन येते. तथापि, दाव्याच्या मजकुरामध्ये कोणतीही दुरुस्ती प्रस्तावित नाही. त्यामुळे सदर दुरुस्तीमुळे प्रस्तुत दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. तसेच प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसुन येते. याउलट दावा पूर्णपणे गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी, न्यायाच्या दृष्टीने व कोणतीही तांत्रीक अडचण येवु नये म्हणुन सदर दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसते. सबब, अर्ज मंजुर करण्यास पात्र ठरतो. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने निशाणी क्र.१० वरील अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती मजकुराचा समावेश करावा.

३. सदरची दुरुस्ती पुढील तारखेपर्यंत करण्यात यावी व तशी दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

VAISHALI SANJAY MORE
Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.18 13:43:06 +0530

दि.१८/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
शेवगाव.